# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## वैद्यकिय अधिक्षक स्त्री रुग्णालय परभणी

## कंत्राटी पदभरती

## थेट मुलाखत

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत **एसएनसियु कक्षात** कंत्राटी तत्वावर वैद्यकिय अधिकारी व अधिपरिचारीका यांची खालील तत्क्यात नमुद विवरणाप्रमाणे पदभरती करावयाची आहे. सदरील पदभरतीसाठी पात्र व इच्छुक उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येत आहे.

| अक्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता | अनुभव | दरमाह एकत्रीत मानधन | रिक्त पदे | सामाजिक आरक्षणानुसार रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | M.B.B.S./MD/DCH | अनुभव असल्यास प्राधान्य | ४०,००० | ०२ | खुला – १<br>अनुसूचीत जाती – १ |
| २ | अधिपरिचारीका | B.sc. Nursing / RGNM | अनुभव असल्यास प्राधान्य | १५,००० | ०८ | खुला – ३<br>इतर मागासवर्ग –३<br>अनुसूचीत जमाती –१<br>(भटक्या जमाती (ब ), भटक्या जमाती (ड), विशेष मागासवर्ग पैकी –१) |

**थेट मुलाखतीचे ठिकाण :– रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र,जिल्हा रुग्णालय,परभणी.**

**थेट मुलाखतीचा दिनांक :– ०९ / ०१ /२०१८**

◆ **अटि व शर्ती :–** www.parbhani.nic.in **वर सविस्तर पणे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.**

(डॉ.के.बी.चौधरी) २९/१२
**सदस्य सचिव निवड समिती तथा**
**वैद्यकिय अधिक्षक**
**स्त्री रुग्णालय परभणी.**

(डॉ.जावेद अथर)
**अध्यक्ष निवड समिती तथा**
**जिल्हा शल्य चिकित्सक,**
**जिल्हा रुग्णालय परभणी.**

## शैक्षणिक अर्हता :-

विशेष नवजात शिशु अतिदक्षता कक्ष (एसएनसीयु विभाग)

१) वैदयकिय अधिकारी (एसएनसीयु) :-

अ) किमान पात्रता एम.बी.बी.एस ब) डी.सी.एच/एम.डी असल्यास प्राधान्य क) वयोमर्यादा ६० वर्षापर्यंत ड) नवजात अर्भक कक्षात कामाच्या अनुभवास प्राधान्य इ) नवजात अर्भक काळजी कक्षात किमान रोज ८ तास शिफट डयुटीमध्ये काम करावे लागेल, आपतकालीन दाखल होणाऱ्या नवजात अर्भकांना तपासणी करुन उपचार करणे, एसएनसीयुमधील अर्भकांचा नियमीत राऊंड घेणे आवश्यक राहीलफ) पदांचा कालावधी अकरा (११) महीन्याचा असेल. ग) संगणकाबाबतचे ज्ञान असल्यास प्राधान्य म) एसएनसीयु दैनंदिन अहवाल बालरोगतज्ञांस ऑनलाईन पध्दतीने सादर करणे.

२) अधिपरिचारीका (एसएनसीयु) :-

अ) किमान गुणवत्ता जी.एन.एम कोर्स मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेचा असावा ब) पदाचा कालावधी अकरा (११) महीन्याचा असेलक) वयोमर्यादा ६० वर्षापर्यंत ड) नवजात अर्भक कक्षात कामाच्या अनुभवास प्राधान्य इ) विशेष नवजात अर्भक काळजी कक्षात बाळांची काळजी घेणे, कक्षातील फाईल किपींग रेकॉर्ड व रजिस्टर अदययावत ठेवणे) संगणकाबाबतचे ज्ञान असल्यास प्राधान्य.

## अटि व शर्ती :-

१) वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत

२) पदांची संख्या गरजेप्रमाणे बदलण्याची शक्यता आहे.

३) वरील पदांचे वेतन हे एकत्रीत मानधन स्वरुपात राहील. पदसंख्या,शैक्षणिक अर्हता,नियुक्तीचे ठिकाण,मुलाखतीची पध्दत व पदभरतीची प्रक्रिया यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकारी निवड समितीला असतील.

४) उच्च शैक्षणिक अर्हता धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. निवड झालेल्या उमेदवारास सुरुवातीला ३१ मार्च २०१८ पर्यंतच नेमणुक दिली जाईल. या कालावधीमध्ये केलेले काम समाधानकारक असल्यास नेमणुकीचा कालावधी वाढविण्याची शक्यता आहे.

५) अधिपरिचारीका व वैद्यकिय अधिकारी या पदाचे उमेदवारास महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सील / महाराष्ट वैद्यकिय कॉन्सील कडे वैद्य रजीस्ट्रेशन असणे बंधनकारक आहे अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविल्या जाईल.

६) उमेदवाराने कलर फोटोसह अर्जा सोबत मुळ कागदपत्रे व त्याच्या छायांकित सत्यप्रतीसह थेट मुलाखतीच्या दिवशी सकाळी १०.०० वाजता रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र, जिल्हा रुग्णालय, परभणी येथे उपस्थित रहावे.

७) थेट मुलाखतीकरिता उपस्थित राहण्यासाठी कुठलाही प्रवास/ दैनिक भत्ता दिला जाणार नाही.

८) उमेदवाराची निवड झाल्यावर जिल्हा एकात्मीक आरोग्य व कुटुंब कलयाण सोसायटी परभणी यांच्याकडे रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर कराररनामा भरुन देणे बंधनकारक राहिल.

९) भरती प्रक्रियेसंबंधी सर्व अधिकार तसेच अर्ज स्वीकारणे / नाकरणे अथवा भरती प्रक्रिया संपूर्णपणे रदद करण्याचा अधिकार निवड समितीने राखून ठेवला आहे.

१०) मुलाखत दिनांकास संपूर्ण पदभरती न झाल्यास अक्र. १ ची पदे भरेपर्यंत दर मंगळवारी भरती प्रक्रिया सुरु ठेवण्यात येईल.

११) उपरोक्त अक्र.१ ते २ मधील राखीव गटाचे उमेदवार उपलबध न झाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारास तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल व संबंधीत प्रवर्गाचा उमेदवार प्राप्त झाल्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१२) उमेदवारास गुणानुक्रमे एकास पाच (१ : ५) याप्रमाणे मुलाखतीकरिता बोलविण्यात येईल.

१३) सदरील पदे ही योग्यता आधारीत कौशल्य (Skill Evaluation Protocol) नुसार तोंडी मुलाखत घेउन भरली जातील.

१४) सदरील सर्व पदे प्रमाणित बिंदुनामावलीनसारच भरण्यात येत आहेत.

१५) मुलाखत दिनांकामध्ये बदल करण्याचे अधिकार खालील स्वाक्षरितांना आहे.

१६) सदरची भरती प्रक्रिया स्थगित करणे अथवा पूर्णपणे रद्द करण्याचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवेलेले आहेत.

१७) वरील पदांना कोणतेही इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

१८) निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. निवडीनंतर १ वर्ष कालावधी करीता प्रतिक्षा यादी ग्राहय धरण्यात येईल.

१९) निवड झालेल्या उमेदवारांना समितीने तयार केलेल्या अटी व शर्ती मान्य कराव्या लागतील व १००/- रुपयाचे करारपत्रक सादर करावे लागेल.

२०) जाहीरातीत नमुद पदे पदसंख्या, पदस्थापनेचे ठिकाण व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

**(डॉ.के.बी.चौधरी)**
**सदस्य सचिव निवड समिती तथा**
**वैद्यकिय अधिक्षक**
**स्त्री रुग्णालय परभणी.**

**(डॉ.जावेद अथर)**
**अध्यक्ष निवड समिती तथा**
**जिल्हा शल्य चिकित्सक,**
**जिल्हा रुग्णालय परभणी.**